न्यायदंडाधिकारी वर्ग–०१ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

नि.फौ.खटला क्र. ६०/२०२४

नि. क्र. ३९

## दोषारोपपत्र

**मी, श्रीमती रोहिणी आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की,**

**आरोपीचे नांव** – 

**१.** विघ्नेश बळीराम भेरे,
**वय** – २९ वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**२.** गणेश बळीराम भेरे,
**वय** – २६ वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**३.** आदित्य बळीराम भेरे,
**वय** – २५ वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**४.** दिपक सुरेश भेरे,
**वय** – २७ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,

**५.** बळीराम रामचंद्र भेरे,
**वय** – ५५ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**सर्व राहणार** – आंगवली,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**यांचेवर खालीलप्रमाणे दोषारोप निश्चीत करीत आहे की,**

तुम्ही सर्व आरोपींनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने आपापसात मिळून दिनांक १४/०५/२०२४ रोजी दुपारी ०:३० वाजता मौजे बोंडये, भेरेवाडी येथे यशवंत सोमा गुडेकर

यांच्या अंगणात व लगत समोरील मळीत तुम्ही सर्वांनी बेकायरेदशीररीत्या जमाव जमविला व त्या जमावाचे तुम्ही सदस्य होता व त्याद्वारे, तुम्ही **भा.दं.वि.चे कलम १४३ अन्वये** शिक्षापात्र असलेला गुन्हा केला.

दुसरे असे की, उपरोक्त वेळी, तारीख व ठिकाणी तुम्ही आरोपींनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायरेदशीररीत्या जमाव जमवून दंगा केला व त्याद्वारे, **भा.दं.वि. चे कलम १४७ सह कलम १४९ अन्वयेचा** चा दंगा हा अपराध केला.

तिसरे असे की, उपरोक्त वेळी, तारीख व ठिकाणी तुम्ही आरोपींनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायरेदशीररीत्या जमाव जमवून फिर्यादी नामे – अविनाश सुरेश गुरव याला छातीवर व तोंडावर लाथ मारुन मळीत पाडले, तसेच त्यांना हाताने व लाथेने मारहान करुन दुखापत केली व फिर्यादीची आई सुरेखा सुरेश गुरव हि सोडवा–सोडव करण्यासाठी मध्ये पडली असता तिच्या गालावर हाताने चापट मारुन दुखापत केली व त्याद्वारे, **भा.दं.वि. चे कलम ३२३ सह कलम १४९ अन्वयेचा** चा दंगा हा अपराध केला.

चौथे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपींनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायरेदशीररीत्या जमाव जमवून फिर्यादीस ''भेटशील तेथे ठार मारीने'' अशी धमकी देवून फौजदारी धाकदपटशा दाखविला व त्याद्वारे,**भा.दं.वि. चे कलम ५०६ सह कलम १४९ अन्वयेचा** गुन्हा केला.

**सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल**.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.17 18:13:59 +0530

**स्थळ – देवरुख**

**दिनांक – १४/०७/२०२५**

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**<u>प्रमाणपत्र</u>**

आरोपींना आरोप पत्रातील मजकूर त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.17 18:14:10 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – १४/०७/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

- : C E R T I F I C A T E : -

Judgment/order/evidence/charge in R.C.C. No.60/2024

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 14/07/2025 |
| Charge signed by PO. on | :- | 14/07/2025 |
| Charge uploaded on | :- | 17/07/2025 |